# जिल्हा परिषद रत्नागिरी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन

माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२

## समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथमिक)

दूरध्वनी क्र.:- ०२३५२-२७१००६ ई-मेल:-samgra.rtn@yahoo.com


जा.क्र.रजिप/शिक्षण/सशि-४ /IED/ ७५७ /२०२६ दिनांक :- 06/03/2026

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साहित्य साधने खरेदी व पुरविणे

## दरपत्रक नोटीस

समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, रत्नागिरी मार्फत सन 2025 – 26 या शैक्षणिक वर्षात समावेशित शिक्षण या योजनेंतर्गत जिल्ह्यातील विशेष गरजाधारक बालकांच्या शैक्षणिक गरजा ओळखून Providing Aids & Appliances मिळणेसाठी अंमलबजावणी करावयाची आहे. त्यानुसार साहित्य साधने खरेदी करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रक मागविणेत येत आहे.

दरपत्रक दिनांक ०६.०३.२०२६ पासून ते दिनांक १२.०३.२०२६ रोजी कार्यालयीन वेळेमध्ये शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे सादर करावयाचे आहेत. दरपत्रक दिनांक १३.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्या दिवशी दरपत्रक उघडणे शक्य न झाल्यास अन्य सोयीचे दिवशी दरपत्रक उघडण्यात येतील. दरपत्रक उघडताना पुरवठादार अनुपस्थितीत राहिल्यास पुरवठादाराचे अनुपस्थितीत दरपत्रके उघडण्यात येतील. मागाहून पुरवठादार यांची कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही. दरपत्रकातील निकष व अटी पुरवठादार यांना बंधनकारक राहतील. कोणतेही कारण न देता दरपत्रक रद्द करणेचे अथवा पात्र दरपत्रकधारांशी वाटाघाटी करणेचे सर्व अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवलेले आहेत.

### दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साहित्य साधने – (प्राथमिक स्तर)

### साहित्य साधने तपशिल

| | | |
|---|---|---|
| श्रवणयंत्र | केलीपर शूज | कुबड्या |
| लो व्हिजन कीट | मॉडीफाय चेअर | वाकिंग स्टिक |
| व्हिलचेअर | सी. पी. चेअर | रोलेटर |
| कमोड चेअर | अंध काठी | वाकर |
| एम.आर. कीट | एल्बो क्रंच | चष्मा |

समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, मधून दिव्यांग विद्यार्थ्यांना समावेशित शिक्षण या योजनेंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य साधने खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

**अ ) अटी व शर्ती –**

1. **एका पुरवठादाराला एकच दरपत्रक भरता येईल. दरपत्रकावरती प्राथमिक स्तर असे नमूद करावे.**
2. दरपत्रक सादर करताना प्रती नगाची किंमत सर्व करासहीत व वाहतूक खर्चासहीत नमुद करावी.
3. पुरवठादार यांनी सोबत PAN कार्डची प्रत सादर करावी.
4. पुरवठादार यांनी सोबत जीएसटी प्रमाणपत्र सादर करावे. जीएसटी लागू नसल्यास तसे स्वयंघोषणापत्र सादर करावे.
5. पुरवठादार यांनी व्यवसाय प्रमाणपत्र सादर करावे.
6. पुरवठादार यांनी चालू आर्थिक वर्षात इन्कमटॅक्स रिटर्न्स भरल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

CS CamScanner

7. दरपत्रक विहित मुदतीत सादर करावीत.
8. पुरवठा आदेश देणेपुर्वी सर्व अटी शर्ती मान्य असल्यायावत रु.५००/- चे मुद्रांक शुल्क बंधपत्रावर करारनामा करून देणे बंधकारक राहील.
9. कोणतेही दरपत्रक मंजुर करणेचा अगर नाकारण्याचा, अटी व शर्ती शिथील करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. रत्नागिरी यांना राहील.
10. . पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसाचे आत पुरवठा करणे बंधनकारक राहील. यात विलंब झाल्यास शासन पर्चेस मॅन्युअल नुसार प्रती आठवडा ०.५ टक्के ते १० टक्के पर्यंत दंड आकारला जाईल.
11. सदर दरपत्रकासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी जि.प. रत्नागिरी याचा निर्णय अंतिम राहील.
12. पुरवठाधारकाने सादर केलेले दरपत्रक स्विकृतीच्या दिनांकापासून ३१ मार्च २०२६ पर्यंत ग्राह्य राहतील. जादा मालाचा पुरवठा करावयाचा असेल तर दिलेल्या दराप्रमाणे त्याच अटी व शर्ती नुसार पुरवठा करावा लागेल.

**ब ) Providing Aids & Appliances साठी अटी व शर्ती -**

1. दिव्यांग विद्यार्थ्यांना सुलभ हलन चलनासाठी अनुकुलीत साहित्य साधने असावीत.
2. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार साहित्य साधने असावीत.
3. दिव्यांग विद्यार्थ्यांचे मोजमाप करून आवश्यकतेनुसार साहित्य साधने असावीत.
4. नोंदणीकृत पुरवठादाराकडून साहित्य खरेदी करावयाचे आहे.
5. आवश्यक असलेल्या साहित्याचा सुस्थितीत पुरवठा करण्याची जबाबदारी मंजुर दरपत्रकधारकाची असेल.
6. पुरविण्यात येणाऱ्या साहित्यांचा तपशील ८ दिवस अगोदर या कार्यालयास कळविणे तसेच त्यात काही बदल सुचविल्यास त्या प्रमाणे बदल करणे बंधनकारक आहे.
7. पुरविलेल्या साहित्य साधनांमध्ये समस्या उद्भवल्यास त्यास दरपत्रकधारक जबाबदार असेल आणि अशा समस्या उद्भवणार नाही याची मंजुर दरपत्रकधारकाने दक्षता घ्यावयाची आहे.
8. कॅलिपर शूज ची आवश्यकता असणाऱ्या विद्यार्थ्यांची तपासणी करून विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार कॅलिपर शूज देण्यात यावे. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला तालुकास्तरावर जाऊन कॅलिपर बसवून देण्यात यावे.
9. सदर साहित्य ISO नामांकन असलेले असावेत.
10. साहित्य विद्यार्थ्यांना पोहोच झाल्यास तात्काळ बिल सादर केल्यानंतर मंजूर रक्कम अदा करण्यात येईल.
11. दरपत्रके शिक्षण विभाग (प्राथ.), जि.प. रत्नागिरी येथे समक्ष सादर करण्यात यावीत.

तरी उपरोक्त प्रमाणे दरपत्रके दि.१२.०३.२०२६ पर्यंत बंद लिफाफ्यात दरपत्रके शिक्षण विभाग (प्राथ.), जि.प. रत्नागिरी येथे समक्ष सादर करण्यात यावीत.

**दरपत्रके लिफाफा (BOQ)**

तांत्रिक कारणास्तव किंवा दरपत्रकामध्ये वाद निर्माण झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांजकडे राखून ठेवले आहेत. तसेच या दरपत्रकामधील अटी व शर्ती या बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचा निर्णय हा अंतिम निर्णय राहील. सदरची जाहिरात www.zpratnagiri.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

CamScanner